**स्थायी निदेश क्र.२४-२०२५**

**नगरपरिषद आस्थापना कर्मचारी यांच्या सेवा विषयक बाबी व अनुज्ञेय लाभाबाबत.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका इमारत,**
**७ मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी.बेलापूर मुंबई ४००६१४**
**क्र.नपप्रस/प्र.क्र.30/स्थायी नि.२४-२०२५/न.प.आस्था.कर्म/सेवा वि.बाबी./कक्ष-१२/1957**
**दिनांक :- 28 FEB 2025**

**वाचा:-**

१) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ७६ अन्वये आयुक्त तथा संचालकांना असलेले अधिकार
२) नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे आदेश क्र. इएसटी/ ११८४/ प्र.क्र.२१/६, दि. १४/५/१९८४
३) सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. प्राणिम/१२९०/प्र.क्र. ६९/९०/१३ अ, दि. १०.२.१९९२
४) सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. प्राणिम/१०९९/५५५/प्र.क्र. ६९/९०/१३ अ, दि. ११.६.१९९९.
५) नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे आदेश क्र.डब्ल्युपी/२००१/४/५.दि.२२/१/२००४
६) नगरपरिषद प्रशासन संचालनालय आदेश क्र. नपप्रसं/म.मा.से. अनुज्ञेय लाभ/२००४ /प्र.क्र.७५१/५ दिनांक ८/२/२००५.
७) नगरपरिषद प्रशासन संचालनालय आदेश क्र. नपप्रसं/न.ना.से.अनुज्ञेय लाभ/००४ /प्र.क्र.७५९/५ दिनांक ८/२/२००५.
८) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. सीएफआर-१२११/प्र.क्र.२५७/तेरा, दि. ०२/०२/२०१७.
९) शासन निर्णय क्र. सीएफआर-१२११/प्र.क्र.२५७/तेरा, दि. ०७/०२/२०१८

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ७६(१) नुसार नगरपरिषद च्या आस्थापनेवर पद निर्मितीचे अधिकार तसेच कलम ७६(२) नुसार नगरपरिषद आस्थापनेवर पदांची अर्हता, वेतन भत्ते व सेवेच्या शर्ती तसेच त्यांच्या सेवाप्रवेशाच्या पद्धती विहित करण्याचे अधिकार आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना आहेत. नगरपरिषद प्रशासन संचालनलयाचे संदर्भ क्र.२, मध्ये नमुद केलेल्या दि.१४/५/१९८४ चे आदेशान्वये राज्यातील नगरपरिषद आस्थापने वरील कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियमांचे लाभ लागु करण्यात आले आहेत. परंतु जे लाभ शासकीय कर्मचा-यांना देण्यात येतात ते सर्व लाभ नगरपरिषद कर्मचा-यांना ही लागु होतात असा समज नगरपरिषदांचा होता. अधिनियमातील तरतुदीनुसार उन्नत वेतनश्रेणी मध्ये पद निर्मितीनंतर पदोन्नती बाबत, सर्वसाधारण परिस्थिती मध्ये नगरपरिषद कर्मचा-यांच्या देण्यात येणा-या

पदोन्नतीबाबत व नगरपरिषद आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या बदल्यांबाबत तसेच सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांना देण्यात येणा-या लाभाबाबत स्पष्टता देण्यासाठी व शासकीय कर्मचा-यांसाठी देण्यात येणारे इतर लाभाच्या संदर्भात काही धोरणात्मक निर्णय घेतले जातात ते सर्व निर्णय नगरपरिषद कर्मचाऱ्यांना लागु आहे किंवा नाही याबाबत मार्गदर्शन देण्याची गरज विचारात घेवून खालील प्रमाणे सूचना करण्यात येत आहे. उपरोक्त आस्थापना बाबी संदर्भात यापुर्वी काढलेले स्थायी निदेश क्रमांक १६,१८,२०,२२, २२अ, २८ अधिक्रमित करण्यात येत आहेत.

**आदेश:-**

**(अ) नगरपरिषद कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवांतर्गत अनुज्ञेय असलेल्या लाभाबाबत.**

१) संदर्भ १ येथे नमुद केलेल्या आदेशान्वये नगरपरिषद कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागु केल्याचे कळविण्यात आले होते सध्या खालील सेवा नियम राज्यातील शासकीय कर्मचा-यांना लागु करण्यात आलेले आहे.

अ. महाराष्ट्र नागरी सेवा ( सेवेच्या सर्वसाधारण शर्ती ) नियम
ब. महाराष्ट्र नागरी सेवा ( वेतन ) नियम १९८१
क. महाराष्ट्र नागरी सेवा ( पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे याच्या काळातील प्रदाने ) नियम १९८१.
ङ. महाराष्ट्र नागरी सेवा ( रजा ) नियम १९८१.
ई. महाराष्ट्र नागरी सेवा ( शिस्त आणि अपिल ) नियम १९७९.
फ. महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्तीवेतन ) नियम १९८२.
ह. महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण ) नियम १९८४.
ग. महाराष्ट्र नागरी सेवा ( वर्तणुक ) नियम १९७९.

२) वरील नियम नगरपरिषदेने आपल्या कर्मचा-यांना लागु करणे बाबत आर्थिक स्थिती पाहुन निर्णय घ्यावा.

३) महाराष्ट्र नागरी सेवा नियमाव्दारे दिलेल्या लाभा व्यतिरिक्त महाराष्ट्र शासन त्यांचे कर्मचा-यांना काही इतर लाभ देतात उदा. स्थानिक पुरक भत्ता, घरभाडे भत्ता, स्वग्राम प्रवास भत्ता, वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती, वाहतुक भत्ता इत्यादी. नगरपरिषदेने आपली आर्थिक स्थिती विचारात घेवून आपल्या कर्मचा-यांना लाभ द्यावयाचे असल्यास शासकीय कर्मचा-यांना लागु असल्यापेक्षा जास्त नाही या मर्यादेत कर्मचा-यांना असे लाभ खालील अटीवर देवू शकतील.

अ) घरभाडे,स्थानिक पूरक भत्ता इत्यादी लाभ शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच द्यावयाचा नगरपरिषदानी निर्णय घेतल्यास निधी मोठ्या प्रमाणावर याकामी खर्च करावा लागेल. नगरपरिषदानी आर्थिक परिस्थितीचा विचार करूनच हा लाभ नगरपरिषद कर्मचाऱ्याना देण्याबाबत स्थानिक पातळीवर नगरपरिषदानी विचार करावा.

ब) नगरपरिषद कर्मचाऱ्यांना रजा प्रवास सवलत आपोआप लागू नाही. परंतु नगरपरिषद कर्मचाऱ्यांना चार वर्षातून एकदा जिल्ह्यात/ राज्यात रजा प्रवास सवलत देण्यासाठी नगर परिषदांनी विचार करावा.

क) नगर परिषदांचे स्वतःचे दवाखाने रुग्णालये यामध्ये किंवा शासकीय रुग्णालयात नगरपरिषद कर्मचाऱ्यांना मोफत नाममात्र शुल्क आकारून वैद्यकीय लाभ उपलब्ध असतात. ही सवलत असल्यामुळे नगरपरिषद कर्मचाऱ्यांना कोणत्या परिस्थितीत वैद्यकीय प्रतीपूर्ती द्यावी याबाबत नगर परिषदांनी निर्णय घ्यावे किंवा गट वैद्यकीय विमा योजनेच्या विम्याचा हफ्ता याचे प्रमाण (जसे की संबंधित कर्मचारी आणि नगरपरिषद ५०-५०%) हे नगरपरिषदेला ठरविता येईल.

४) नगरपरिषद आस्थापने वर कार्यरत असणा-या प्रतिनियुक्ती वरील शासकीय कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचा-यांचे सर्व सेवा विषयक लाभ अनुज्ञेय राहतील.

५) शासनाचे धोरणानुसार आस्थापना खर्च विहित मर्यादेत असणे आवश्यक असल्याने तसेच एकाच आस्थापनेवरील नगरपरिषद कर्मचाऱ्यांना किमान आर्थिक फायदे मिळणे आवश्यक असल्याने शासनाने विहित केलेल्यापेक्षा आस्थापना खर्च जास्त होत असल्यास अशा नगरपरिषदांनी महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या लाभापैकी फक्त किमान लाभ सर्व कर्मचाऱ्यांना देणेचा आहे .

६) नगरपरिषद कर्मचाऱ्यांना लाभ मंजूर करताना आस्थापना खर्च प्रचलित शासन धोरण, स्थायी निदेश तसेच परिपत्रक इत्यादी अन्वये विहित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक असू नये.

**(ब) नगरपरिषद आस्थापनेवर आढावा अंती सुधारित उन्नत वेतन श्रेणीमध्ये पद निर्मितीनंतर नगरपरिषद कर्मचा-यांची पदोन्नती बाबत.**

१) ज्या नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील आढाव्या अंती सुधारित आकृतीबंधामध्ये उच्च वेतनश्रेणीत कोणत्याही संवर्गातील पद उन्नत करण्यात आले असल्यास मूळ पदावरील कार्यरत कर्मचाऱ्यांला आपोआप उन्नत पदाची उच्च वेतनश्रेणी लागू करता येणार नाही. जोपर्यंत उन्नत पदावर पदोन्नतीने कर्मचाऱ्यांची नियुक्ती होत नाही ,तोपर्यंत सदर पद मूळच्या वेतनश्रेणी मध्ये तात्पुरत्या स्वरुपात अवनत करून त्यावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यास वेतन अदा करण्यात यावे. नगरपरिषदेने पदोन्नतीबाबत विहित कारवाई केल्यानंतर पदोन्नतीमध्ये पात्र ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांस उन्नत पदाची वेतनश्रेणी लागू होईल. ज्या नगरपरिषद च्या आस्थापनेवर उन्नत वेतनश्रेणीमध्ये पद निर्माण करण्यात आले आहे त्यानंतर मूळच्या वेतन श्रेणीमधील नगरपरिषद कर्मचारी यांना उन्नत वेतन श्रेणी आपोआप लागू केली असेल तर ती अनियमित पदोन्नती समजण्यात यावी.

२) परंतु त्या कर्मचाऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून त्यावेळी विहित असलेली पदोन्नती साठीची कार्य पद्धती अवलंबून ते कर्मचारी जर जेष्ठता, पात्रता, अर्हता इ. बाबींची पूर्तता करत असतील त्यांना पदोन्नती देण्याबाबतचा प्रस्ताव नगरपरिषद च्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवावा. सर्वसाधारण सभेमध्ये उन्नत वेतनश्रेणीतील पदांवर पदोन्नती देण्याबाबत पूर्वलक्षी प्रभावाने निर्णय घेतल्यानंतर महाराष्ट्र नागरी सेवा नियम (वेतन) नियम १९८१ नियम ११ नुसार त्या कर्मचाऱ्यांची वेतन निश्चितीचे आदेश काढावेत व त्यानुसार सेवा अभिलेखातील नोंदी सुधारित करण्यात याव्यात .

३) ज्या कर्मचारी यांना त्यावेळी विहित केलेली पदोन्नती साठीच्या कार्य पद्धती नुसार सर्वसाधारण सभेने अपात्र ठरविल्यास त्या कर्मचाऱ्यांकडून अतिप्रदानाची रक्कम महाराष्ट्र नगरपरिषद लेखा नियम १९७१ नियम १२६ व महाराष्ट्र नगरपरिषद , नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ९६ नुसार वसूल करण्यात यावी.

४) नगरपरिषद आणि नगरपंचायतीमध्ये पदोन्नातीसाठी शैक्षणिक व अनुभवाच्या अटी पूर्ण करत असलेल्या कर्मचाऱ्यांचा वर्ग उपलब्ध नसल्यास, त्या पदाचा दर्जा /श्रेणीतात्पुरत्या स्वरूपात त्याच संवर्गामध्ये एक श्रेणीने (grade) अवनत/कमी(Downgrade) करता येईल. अवनत केलेले पद नवीन भरतीने भरत असताना शैक्षणिक पात्रता अनुभवाच्या अटी व्यतीरिक्त इतर अटी पूर्ण असणे आवश्यक आहे. अनुभवाची अट पूर्ण झाल्यानंतर हे पद उन्नत होईल.नविन भरतीचे पद नियुक्त केलेल्या पदोन्नती समितीच्या शिफारशीनुसार पद फक्त त्याच संवर्गामध्ये अवनत करता येईल.एका संवर्गातील पद दुसऱ्या संवर्गामध्ये अवनत करता येणार नाही. तसेच वर्ग ३ चे पद वर्ग ४ मध्ये अवनत करत येणार नाही. अवनत केल्यानंतर त्या पदावरील कार्यरत कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी अवनत पदाप्रमाणे असेल.पदोन्नतीसाठी शैक्षणिक व इतर अटी पूर्ण असलेला कर्मचारी वर्ग उपलब्ध झाल्यानंतर ह्या पदाचा दर्जा /श्रेणी वाढवता/उन्नत(upgrade) करता येईल.

**(क) नगरपरिषद/ नगरपंचायती कर्मचा-यांच्या पदोन्नतीबाबतची कार्यपध्दत एकत्रित आदेश.**

१) महाराष्ट्र नागरी सेवा नियम हे या संचालनालयाच्या दि. १४.५.८४ च्या आदेशान्वये सर्व नगरपरिषदाला लागू केलेले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र नागरी सेवा ( सेवाजेष्ठता विनियम ) नियम १९८२ नुसार नगरपरिषद यांनी कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता यादी प्रतिवर्षी अद्यावत करायची आहे.

२) जे पद पदोन्नती ने भरायचे आहे ते पद प्रचलित नियमानुसार भरण्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता असणे आवश्यक आहे. तसेच सदरचे पद आस्थापनेवर मंजूर असून ते रिक्त असल्यास व्यपगत झालेले नसावे.

३) नगरपरिषद/ नगरपंचायत कर्मचा-यांना पदोन्नती देताना या कार्यप्रणालीमध्ये पारदर्शकता असावी यासाठी खालीलप्रमाणे पदोन्नती समिती गठीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| अ . जिल्हा सहआयुक्त नगरपरिषद प्रशासन | समिती अध्यक्ष |
| ब . जिल्हा सहआयुक्त यांनी नियुक्त केलेला नगरपरिषद संवर्गातील लेखा अधिकारी | सदस्य |
| क . संबंधित नगरपरिषद मुख्याधिकारी | सदस्य सचिव |

त्याच बरोबर वरील तीन अधिकाऱ्यांपैकी एक अधिकारी मागासवर्गीय संवर्गातील असावा नसल्यास एक अधिक मागासवर्गीय सदस्य ( श्रेणी-२) जिल्हा सह आयुक्त यांच्यामार्फत नामनिर्देशित करण्यात यावा.

४) पदोन्नती देताना मागासवर्गीय आरक्षणाच्या बाबतीत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट यांचिका (स्टँप) क्र. १०८७६/२०२१, १०८७८/२०२१ यामधील आय.ए.क्र. १०९१०/२०२१, १०९११/२०२१ तसेच, रिट याचिका (स्टँप) क्र. १०९१०/२०२१ मध्ये जो निर्णय होईल याचा विचार करावा. दिव्यांगसाठी शासनाने पदोन्नती मध्ये आरक्षण ठेवले आहे. त्याचा पदोन्नती देताना विचार करावा.

५) आवश्यकतेनुसार बिंदू नामावली विभागीय आयुक्त कार्यालयातील मागासवर्गिय कक्षाकडून तपासून घ्यावीत. तसेच मागासवर्गिय कर्मचा-यांच्या बाबतीत त्याचे जातीचे प्रमाणपत्र पदोन्नती पूर्वी निश्चित करण्यात यावे. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. सीएफआर-१२११/प्र.क्र.२५७/तेरा, दिनांक ०२/०२/२०१७ आणि शासन निर्णय क्र. सीएफआर-१२११/प्र.क्र.२५७/तेरा, दिनांक ०७/०२/२०१८ अन्वये गोपनीय अहवालाची कार्यपध्दत अवलंबून पदोन्नती पूर्वी गोपनीय अहवालाची प्रतवारी निश्चित करण्यात यावी.

६) वरील सर्व बाबींचा विचार करुन समितीने पदोन्नतीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेसाठी ठेवावा. मंजुरी नंतर उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी.

७) कालबध्द पदोन्नतीचे प्रस्ताव देखील सर्वसाधारण सभेच्या मंजुरीने या स्थायी निदेश मधील परिच्छेद क (३) च्या समितीसमोर मान्यतेसाठी ठेवावीत. आणि समितीच्या शिफारशी नंतर पदोन्नती देण्यात यावी.

८) नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती संदर्भातील तक्रारी संदर्भात संबंधित कर्मचारी यांनी महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ३१८ अन्वये आयुक्त व प्रादेशिक संचालक यांचेकडे दाद मागावी.(परी .१२ ते १४ दि १९/१०/२००४ च्या निर्देश नुसार समाविष्ट )

**(ड) नगरपरिषद आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या बदल्यांबाबत.**
**नगरपरिषद आस्थापनेवरील कर्मचा-यांचे कायमस्वरूपी समावेशनाबाबत.**

सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही -२०१६/प्र.क्र.५०९/कार्या.१२ दिनांक १५.०५.२०१९ अन्वये शासकीय कर्मचाऱ्यांच्या विनंतीनुसार संवर्गाअंतर्गत एका नियुक्ती प्राधिक-याच्या अस्थापानेवरून दुस-या नियुक्ती प्राधिका-याच्या आस्थापनेवर कायम स्वरूपी समावेशन करण्याबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या समावेशनाबाबत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहे.

१) एका नगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतून दुसऱ्या नगरपालिकेच्या प्राथमिक शाळेत, महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेत किंवा या उलट पद्धतीने कर्मचारी यांनी समावेशनाची मागणी केली असल्यास असे प्रस्ताव या कार्यालयाकडे पाठविण्यात येऊ नयेत. सदर कामकाज शिक्षण विभागाकडून निर्गमित झालेल्या आदेशान्वये कार्यवाही करावी.
२) नगरपरिषद मधून शासकीय/निमशासकीय कार्यालयात समावेशनाची मागणी असेल तर असे प्रस्ताव संबंधित कार्यालयांकडे पाठविण्यात यावेत. तसेच नगरपरिषद मधून महानगरपालिकेमध्ये समावेशनाची मागणी असल्यास अशी प्रकरणे शासन नगरविकास विभागाकडे पाठविण्यात यावी.
३) कोणते प्रस्ताव समावेशनासाठी पाठवावेत :
नगरपरिषद या स्वायत्त संस्था असून प्रत्येक नगरपरिषद ला कायद्याने स्वतंत्र अस्तित्व दिले आहे व त्यामुळे साधारणतः एका नगरपरिषद मधून दुसऱ्या नगरपरिषद आस्थापनेवर कर्मचाऱ्यांची समावेशन करता येत नाही . तथापि अतिशय अपवादात्मक परिस्थितीत फक्त खालील कारणासाठी प्रस्तावित केलेली समावेशनाची मागणी विशेष बाब म्हणून मान्यता देण्यासाठी संपूर्ण सेवा कालावधीत फक्त एकदाच विचारात घेण्यात येईल .

i. पती पत्नी एकत्रिकरण.
ii. मतीमंद मुलांच्या पालकांचे समावेशन- मतीमंद मुलांच्या औषधोपचारासाठी किंवा विशेष शिक्षणासाठी विशिष्ट स्थानी समावेशन मिळण्याची विनंती केली असल्यास ( कर्मचाऱ्यांचा पाल्य मतीमंद असलेचे सक्षम शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर केले असल्यास)

iii. कर्मचाऱ्याची स्वतःची, पतीची/पत्नीची, मुलांची कायमस्वरूपी विकलांगता असल्यास व औषधोपचारासाठी विशिष्ट स्थानी समावेशन करण्याची विनंती केली असल्यास (जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रमाणपत्र सादर केले असल्यास)

४) i) उपरोक्त नमूद केलेल्या कारणासाठी एका जिल्हयातील नगरपरिषद अस्थापानेवरून त्याच जिल्हयातील दुस-या नगरपरिषद अस्थापनेवर आपापसात समावेशनाची मागणी केलेले प्रस्ताव जिल्हा सह आयुक्त यांच्याकडे सादर करावा. सदर समावेशनाबाबत जिल्हा सह आयुक्त हे सक्षम प्राधिकारी असतील.

ii) उपरोक्त नमूद केलेल्या कारणासाठी एका प्रशासकीय विभागातील एका जिल्हयातील नगरपरिषद अस्थापनेवरून त्याच विभागातील मात्र इतर जिल्हयातील दुस-या नगरपरिषद आस्थापनेवर समावेशनाची मागणी केलेले प्रस्ताव प्रादेशिक सह आयुक्त यांच्याकडे सादर करावा. सदर समावेशनाबाबत प्रादेशिक सह आयुक्त हे सक्षम प्राधिकारी असतील.

iii) उपरोक्त नमूद केलेल्या कारणासाठी एका प्रशासकीय विभागातील नगरपरिषद अस्थापानेवरून दुस-या प्रशासकीय विभागातील नगरपरिषद आस्थापनेवर समावेशनाची मागणी केलेले प्रस्ताव नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्याकडे सादर करावा. सदर समावेशनाबाबत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय हे सक्षम प्राधिकारी असतील.

५) प्रस्ताव सादर करण्यापूर्वी विचारात घ्यावयाचे मुद्दे :

i. समावेशन एकतर्फी किंवा आपसातील समावेशन असू शकेल. समावेशनामध्ये समावेश असलेल्या दोन्ही नगरपरिषद चा सर्वसाधारण सभेचा ठराव /शासकीय /निमशासकीय कार्यालयांची मान्यता असणे आवश्यक राहील.

ii. समावेशनाची मागणी केलेल्या कर्मचाऱ्यांकडे सदर पदास आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता व अनुभव असणे आवश्यक आहे. सदर पदाची वेतनश्रेणी कर्मचारी सध्या घेत असलेली वेतनश्रेणीशी समतुल्य असावी किंवा अर्जदार कमी वेतनश्रेणी असलेल्या पदावर जाण्यास तयार असावा. कोणत्याही परिस्थितीत उच्च वेतन श्रेणी मधील समावेशन मान्य करण्यात येणार नाही. तसेच कर्मचाऱ्याचे खालील अ.क्र. ०८ च्या शर्तीमध्ये नमूद केल्याप्रमाणे शपथ पत्र आवश्यक राहील.

iii. नगरपरिषद आस्थापनेवरील रिक्त पदावर कर्मचारी नियुक्तीसाठी प्रस्ताव जिल्हा निवड समितीकडे सादर केला असल्यास अशा रिक्त पदावर समावेशनाने करावयाच्या नियुक्तीस जिल्हा निवड समितीची मान्यता घेणे संबंधित नगरपरिषदेस बंधनकारक राहील.

६) समावेशनासाठी अर्ज केलेल्या कर्मचाऱ्यांने/नगरपरिषदेने खालील अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे:

i. समावेशनाची मागणी करणारे कर्मचारी महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ७६ अन्वये मंजुरी दिलेल्या पदांवरील कर्मचारी असावेत.

ii. समावेशनाची मागणी केलेल्या कर्मचाऱ्यांची मूळच्या नगरपालिकेमध्ये किमान ३ वर्षे सलग सेवा झालेली असावी .

iii. या कर्मचारी विरुध्द कोणतीही विभागीय चौकशी सुरु नसावी अथवा फौजदारी गुन्हे दाखल केलेले नसावेत .

iv. संबंधित कर्मचारी संदर्भात लेखापरीक्षणात घेण्यात आलेल्या आक्षेपाबाबत तसेच त्यांचे नावे असलेल्या सर्व आगाऊ रकमांचे समायोजन करून घेणे त्यांची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

v. संबंधित कर्मचारी यांचेवर मूळ नगरपरिषदेचे थकबाकीदार नसावा.

vi. समावेशनाच्या तारखेला कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या खात्यात जमा असलेली रक्कम, निवृत्तीवेतन वर्गणी व रजावेतन वर्गणी समावेशन झालेल्या नगरपरिषदकडे वर्ग करावी लागेल.

७) समावेशन झालेल्या कर्मचाऱ्यांस स्विकारणाऱ्या प्राधिकरणाने खालील मुद्दे विचारात घेणे आवश्यक आहे.

i. एकतर्फी समावेशनाने ज्या नगरपालिकेमध्ये बदलून जायचे आहे त्या नगरपालिका आस्थापनेवर सदरचे पद स्थायी स्वरुपात मंजूर असून ते रिक्त असणे आवश्यक आहे. तसेच सदरचे पद व्यपगत झालेले नसून ते भरण्यासाठी सक्षम प्राधिकरणाची मान्यता असावी .

ii. ज्या पदांवर समावेशन प्रस्तावित केली आहे अशा पदांचा संवर्ग व कर्मचाऱ्यांचा संवर्ग (अ.जा., अ.ज., वि.जा.भ.ज.,वि.मा.प्र., व खुला ) हे पडताळणे आवश्यक राहील. म्हणजेच अर्जदार रिक्त पदाच्या संवर्गाचाच असला पाहिजे.

८) खालील मुद्यांवर कर्मचाऱ्याचे शपथपत्र लिहून घेण्यात यावे.

i. समावेशन नंतरच्या कार्यालयात जेष्ठता ठरविताना मागील सेवेचा फायदा कर्मचाऱ्यांस जेष्ठतेसाठी मिळणार नाही आणि संबंधित कर्मचारी समावेशनाच्या कार्यालयात तेथे अगोदरच नियुक्त केलेल्या कर्मचारी यांना कनिष्ठ राहील.

ii. समावेशनासाठी लागणारा प्रवास खर्च संबंधित कर्मचाऱ्यांस सहन करावा लागेल व रुजू होण्यासाठी पद्ग्रहनावधी मिळणार नाही. पदमुक्त झाल्यानंतर तत्काळ नवीन पदावर रुजू व्हावे लागेल.( प्रत्यक्ष प्रवास कालावधी वगळून )

iii. समावेशनाचा आदेश निर्गमित झाल्यानंतर सदर कर्मचारी यांना पूर्वीच्या नगरपरिषद पदावरील धारणाधिकार संपुष्टात येईल.

iv. संबंधित नगरपालिकेचे सेवानियम बदलून जाणाऱ्या कर्मचाऱ्यांस लागू होतील .या संदर्भात कोणतेही अपील कोणत्याही व्यासपीठाकडे सादर करण्याची संधी सदर कर्मचाऱ्यास मिळणार नाही. (मु.अ./नगरपरिषद/स्थायी समिती/जिल्हाधिकारी/विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक /संचालक नगरपरिषद प्रशासन/ शासन )

v. सदर कर्मचाऱ्यांस शासनाने विहित केलेल्या व भविष्यात विहित केल्या जाणाऱ्या परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

९) प्रस्ताव सादर करण्याची कार्यपद्धती :

i. ज्या कर्मचाऱ्याने समावेशनाची मागणी केली आहे त्यांनी वरील परिच्छेद क्र.४ प्रमाणे समावेशनासाठी पात्र असल्याच्या पुराव्यासह ज्या नगरपरिषद मध्ये कार्यरत आहे त्या नगरपरिषद मुख्याधिकारी यांचेकडे अर्ज सादर करावा.

ii. कर्मचाऱ्यांने समावेशनासाठी दिलेल्या कारणांची मुख्याधिकारी यांनी सत्यता पडताळून कर्मचारी वरील मुद्दा क्र. ६, ७, ८ ची पूर्तता करत असल्यास मुख्याधिकारी यांनी सदर

कर्मचाऱ्यांस ज्या नगरपरिषद मध्ये समावेशनाने जायचे आहे त्या नगरपरिषदेसाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील.

iii. ज्या नगरपरिषद मध्ये समावेशन पाहिजे त्या नगरपालिकेने संबंधित कर्मचाऱ्यांने वरील ९(ii) येथे नमूद केलेला दाखला सादर केल्यानंतर वरील सर्व शर्तींचे पालन होत असल्यास अशा कर्मचाऱ्यास समावेशनाने स्वीकृतीसाठी तयार असलेबाबत ठराव नगरपालिकेने पारित करणे आवश्यक राहील.

iv. समावेशनाची मागणी केलेल्या कर्मचाऱ्यांस स्वीकारणाऱ्या नगरपरिषदेने ठराव केल्यानंतर मूळ नगरपरिषदेने सदर कर्मचाऱ्यास कार्यमुक्त करण्याचा ठराव करणे आवश्यक राहील.

v. समावेशनासंबंधी वरील शर्तींचे पालन होत असल्यास असा परिपूर्ण प्रस्ताव कार्यमुक्त करणाऱ्या नगरपालिकेने प्रस्ताव मुद्दा क्रमांक ३ मध्ये नमुद केलेल्या सक्षम प्राधिकरणाकडे सादर करावा.

१०) सक्षम प्राधिकरणाची मान्यता

नगरपालिकेकडून सादर केलेल्या प्रस्तावावर मुद्दा क्रमांक ३ मध्ये नमुद केलेल्या सक्षम प्राधिकरणांचा छाननी अंती घेतलेला निर्णय अंतिम राहील.

**इ) नगरपरिषद सेवानिवृत्त कर्मचा-यांना देण्यात येणा-या आर्थिक लाभाबाबत.**

१) महाराष्ट्र नागरी सेवा नियम (निवृत्ती वेतन १९८२ मधील) नियम क्रमांक १२९ मधील तरतुदीबाबत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहे.

सर्व नगरपरिषद अध्यक्ष , मुख्याधिकारी, लेखाधिकारी व संबंधित अधिकारी /कर्मचारी यांना असे निदेश देण्यात येत आहेत की, वर उद्घृत केलेल्या तरतुदीकडे विशेष लक्ष द्यावे व त्यानुसार वेळेत कार्यवाही करावी आणि यापुढे सेवानिवृत्त वेतनास किंवा उपदान रकमेच्या प्रदानास विलंब झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन) नियमातील तरतुदीनुसार घ्याव्या लागणाऱ्या व्याजाची जबाबदारी तात्काळ निश्चित करून ती संबंधितांचे वेतन व भत्ते इत्यादी देय रकमेतून वसुलात आणण्यात यावी.

२) राज्यातील नगरपरिषदा /नगरपंचायती मधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतरचे आर्थिक लाभ अदा करण्याबाबत संचालनालयाचे परिपत्रक क्र.नपप्रसं -२०१९/ सेवा.नि.आर्थिक लाभ/प्र.क्र.३४३/कक्ष-५/३९८ दि.३१.०१.२०१९ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

Manoj Vijay Ranade
Digitally signed by Manoj Vijay Ranade
Date: 2025.02.28 16:27:18 +05'30'

**(मनोज रानडे, भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा संचालक**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई**

**प्रत माहितीसाठी अग्रेषित :**

१) मा. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक ,नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व).

३) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा , महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.

४) सह संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, सर्व विभाग.

५) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई (सर्व कार्यासन).

६) निवड नस्ती.

**प्रति,**

१) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक ,नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व).

२) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालये (सर्व).

३) अध्यक्ष /प्रशासक, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व).

४) मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व)